# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७
ई-मेल: election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in

## जाहीर प्रगटन

## विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुकीसंबंधी सूचना

## निवडणूक- २०२२

सर्व संबंधितांना या निवडणूक सूचनेद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ प्राधिकरणांच्या निवडणुका घेण्यासाठी विविध निर्वाचक गण [(१) अध्यापकांचा गट (संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक) (२) प्राचार्यांचा गट (पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक) (३) विद्यापीठ अध्यापकांचा गट (४) व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट (संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी) (५) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा गट (६) विद्यापीठ पदवीधरांचा गट] तयार करण्यासाठी मतदार नावनोंदणी करण्यास्तव विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Election-2022 या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता/ नोंदणी करण्याकरिता अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज स्वीकृती केंद्रावर सादर करणे अनिवार्य आहे. या पद्धतीशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने नावनोंदणी विचारात घेतली जाणार नाही.

अर्ज करतेवेळी अर्जावरील सूचना काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.

पदवीधर मतदार नोंदणीसाठी प्रत्येकी रु. २०/- शुल्क आकारण्यात आले आहे. अर्ज स्वीकृती केंद्रावर शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मतदार नावनोंदणी करण्याचा कालावधी व अर्ज स्वीकृती केंद्राची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | निर्वाचक गण | ऑनलाईन अर्ज करणे | हार्डकॉपी सादर करणे | अर्ज स्वीकृती केंद्र |
|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४.<br>५. | अध्यापकांचा गट<br>प्राचार्यांचा गट<br>विद्यापीठ अध्यापकांचा गट<br>व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट<br>संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा गट | ०१-०६-२०२२ ते २०-०६-२०२२ | २७-०६-२०२२ पर्यंत (स. १०.३० ते सायं. ५.००) | निवडणूक कक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| ६. | विद्यापीठ पदवीधरांचा गट | ०१-०६-२०२२ ते २०-०६-२०२२ | २७-०६-२०२२ पर्यंत (स. १०.३० ते सायं. ५.००) | १. निवडणूक कक्ष, विद्यापीठ<br>२. जे.ई.एस. महाविद्यालय, जालना<br>३. बलभीम महाविद्यालय, बीड<br>४. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई<br>५. विद्यापीठ उपपरिसर उस्मानाबाद<br>६. आदर्श महाविद्यालय, उमरगा |

यानंतर विद्यापीठाच्या निवडणुकीसंबंधी सर्व परिपत्रके, सूचना, माहिती ही वर्तमानपत्राऐवजी उक्त नमूद विद्यापीठाच्या लिंकवर उपलब्ध करून देण्यात येतील. यासंदर्भात कुठलाही पत्रव्यवहार वैयक्तिकरित्या व स्वतंत्रपणे केला जाणार नाही.

कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

संदर्भ क्र. निवडणूक/२०२२/132
दिनांक:- २७-०५-२०२२